सहाय्यकांची सेवा प्रवेशोत्तर परीक्षा व सहाय्यकांच्या
अधीक्षकांच्या पदावर पदोन्नती होण्यासाठी घेण्यात
येणारी परीक्षा — मराठीतून घेण्याबाबत —
----------------------------------------

महाराष्ट्र शासन,
सामान्य प्रशासन विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : इएक्सएम्/१०८०/१७
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
दिनांक : १८ सप्टेंबर, १९८०

पहा :— (१) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक इएक्सएम्-१०७९/१७,
दिनांक ११ नोव्हेंबर, १९७९.
(२) शासन निर्णय क्रमांक इएक्सएम्-१०८०/१७, दिनांक १७ एप्रिल, १९८०

=========

## परिपत्रक

शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग क्रमांक इएक्सएम्-१०८०/१७, दिनांक
१७ एप्रिल, १९८० अन्वये शासकिय कर्मचाऱ्यांचा विभागीय परीक्षा मराठीतून घेतल्या
जाव्यात यासाठी ज्या परीक्षा सध्या इंग्रजीतून घेतल्या जातात त्या परीक्षा मराठीतून
घेण्यात याव्यात. सदर आदेशांना अनुसरून सामान्य प्रशासन विभागातर्फे घेतली जाणारी
सहाय्यकांची सेवा प्रवेशोत्तर परीक्षा व सहाय्यकांची अधिक्षकाच्या पदावर बढती होण्या-
साठी घेण्यात येणारी परीक्षा, ह्या परीक्षा मराठीतून घेतल्या जातील. ह्या परीक्षांसाठी
देण्यात येणारी व्याख्याने मराठीतून देण्याबाबत व्याख्यात्यांना विनंती करण्यात येईल.
२. सर्व मंत्रालयीन विभाग व महाराष्ट्र लोकसेवा आयोग यांना विनंती करण्यात येत
आहे की त्यांनी हे आदेश, सहाय्यकाच्या सेवा प्रवेशोत्तर परीक्षा व अधीक्षकांच्या पदावर
बढती मिळण्यासाठी सहाय्यकांची परीक्षा ह्या परीक्षांना चालू वर्षी बसू इच्छिणाऱ्या
सर्व सहाय्यकांच्या नजरेस आणावेत व त्यांना त्याप्रमाणे कळवावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

आ. द. वैद्य
( आ. द. वैद्य )
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

सर्व मंत्रालयीन विभाग
महाराष्ट्र लोकसेवा आयोग.